# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 19 November 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १९ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भविष्यकालीन कृषी परिसंस्था उभारण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्रित प्रयत्न करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन- पीएम किसान सन्मान योजनेचा २१ वा हप्ता जारी
- बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नितीशकुमार यांचा उद्या दहाव्यांदा शपथविधी
- ५६ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला उद्यापासून गोव्यात प्रारंभ
- बाबा सिद्दीकी हत्येतील प्रमुख आरोपी अनमोल बिश्नोई एनआयएच्या ताब्यात

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथं विचित्र अपघातात दोन महिलांचा मृत्यू

****

विकसित भारतासाठी एक भविष्यकालीन कृषी परिसंस्था उभारण्याकरता सर्व शेतकऱ्यांनी एकत्रित प्रयत्न करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज तमिळनाडूत कोइंबतूर इथं पीएम किसान सन्मान योजनेचा २१ वा हप्ता जारी केल्यानंतर बोलत होते. देशातल्या सुमारे नऊ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात, एकूण १८ हजार कोटी रुपये वर्ग करण्यात आले. यावेळी बोलतांना पंतप्रधानांनी, देशात शेती क्षेत्रात मोठे बदल होत असून, त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होत असल्याचं नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतात प्रायोगिक स्तरावर नैसर्गिक शेतीचा अवलंब करावा, नैसर्गिक शेतीचं हे क्षेत्र दरवर्षी वाढवत न्यावं, असंही पंतप्रधानांनी

सांगितलं. गेल्या अकरा वर्षात केंद्र सरकारने शेतकऱ्यांना हर तऱ्हेने मदत केल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

आंध्रप्रदेशात पुट्टपर्थी इथं श्री सत्यसाईबाबांच्या जन्मशताब्दी सोहळ्याला पंतप्रधान उपस्थित राहिले. सत्य साईबाबांच्या महासमाधीचं दर्शन घेऊन पंतप्रधानांनी आदरांजली अर्पण केली. साईबाबांच्या जीवनकार्याचा गौरव करणारं टपाल तिकीट आणि विशेष नाण्याचं प्रकाशन पंतप्रधानांनी केलं. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवनकुमार यांच्यासह क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, अभिनेत्री ऐश्वर्या राय यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नितीशकुमार उद्या शपथ घेणार आहेत. आज झालेल्या बैठकीत सम्राट चौधरी यांनी नितीशकुमार यांच्या एनडीएच्या विधीमंडळ नेतेपदी नियुक्तीचा प्रस्ताव मांडला, त्याला सर्व आमदारांनी एकमताने पाठिंबा दिला. पाटण्याच्या गांधीमैदानावर हा शपथग्रहण सोहळा होणार आहे. नितीशकुमार यांच्या राजकीय कारकिर्दीचा वेध घेणारा हा संक्षिप्त वृत्तांत –

***अभियांत्रिकीचं शिक्षण घेतलेले नितीशकुमार यांची राजकीय वाटचाल जेवढी प्रदीर्घ तेवढीच स्थिर आहे. जयप्रकाश नारायण यांनी पुकारलेल्या संपूर्ण क्रांती आंदोलनातून राजकारणात सक्रीय झालेले नितीशकुमार, १९८५ साली आमदार म्हणून निवडून गेले. २००० सालच्या मार्च महिन्यात त्यांनी बिहारच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, पण त्यांचा हा कार्यकाळ औट घटकेचाच ठरला. त्यानंतर मात्र २००४ ते २०१४ पर्यंत आणि पुन्हा २०१५ पासून आजतागायत ते बिहारच्या मुख्यमंत्रिपदी कायम आहेत. दुसऱ्या टप्प्यात काही काळ त्यांनी एनडीएची साथ सोडून विरोधकांच्या पाठिंब्याने सरकार चालवलं. मात्र लवकरच ते विरोधकांची साथ सोडून पुन्हा एनडीएत सामील झाले. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या दोन कार्यकाळात त्यांनी रेल्वेमंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली.***

***बदलत्या राजकीय समीकरणांमुळे नितीशकुमार यांच्यावर टीका होते, मात्र प्रशासकीय सुधार, पायाभूत सुविधा, कायदा आणि सुव्यवस्था तसंच महिला सशक्तीकरण या मुद्यांसोबत स्वच्छ प्रतिमेच्या बळावर दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री होत असलेले नितीशकुमार, सुशासनबाबू म्हणून आपली ओळख निर्माण करण्यात कमालीचे यशस्वी ठरले आहेत.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी हर्षवर्धन दीक्षित, छत्रपति संभाजीनगर***

****

मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वातील  काँग्रेसच्या शिष्टमंडळानं आज सकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. आगामी महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या धोरणांवर यावेळी सविस्तर चर्चा झाल्याची माहिती वर्षा गायकवाड यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.

****

देशातील २७२ प्रतिष्ठित नागरिकांनी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसंच काँग्रेस पक्षावर गंभीर आरोप करत एक खुलं पत्र प्रसिद्ध केलं आहे. गांधी यांनी, निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांना कलंकित केल्याचा आरोप या पत्रात करण्यात आला आहे. हे पत्र लिहिणाऱ्यांमध्ये निवृत्त न्यायाधीश, राजदूत, निवृत्त सरकारी अधिकारी आणि सशस्त्र दलातील माजी अधिकाऱ्यांचा समावेश आहे

****

५६वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फी उद्यापासून गोव्यात सुरू होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधल्या २४० चित्रपटांचा समावेश असेल. द ब्लू ट्रेल या चित्रपटाने या महोत्सवाची सुरुवात होणार आहे. गोव्यात मडगाव इथं रवींद्र भवनात हा चित्रपट दाखवला जाईल. येत्या २८ तारखेपर्यंत हा महोत्सव चालेल.

****

नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित पाच दिवसीय प्रदर्शनाला आजपासून मुंबईतल्या आझाद मैदानावर प्रारंभ झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. या कायद्यामुळे न्याय व्यवस्थेत आमूलाग्र बदल होत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. २०१३ मध्ये गुन्हे सिद्ध होण्याचं प्रमाण केवळ ९ टक्के होतं मात्र गेल्या दहा वर्षांत ते वाढून ५३ टक्के झाला आहे, हा दर निश्चितच ९०

टक्क्यांपर्यंत नेण्याची क्षमता या नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येतील प्रमुख आरोपी अनमोल बिश्नोई याला आज अमेरिकेतून भारतात आणल्यानंतर राष्ट्रीय तपास संस्था–एनआयएनं ताब्यात घेतलं. एनआयएनं दाखल केलेल्या आरोपपत्रांमध्ये लॉरेंस आणि अनमोल बिश्नोई या दोघा भावांनी २०२० ते २०२३ या काळात गोल्डी ब्रार या दहशतवाद्याला विविध गुन्ह्यांत मदत केल्याचं म्हटलं आहे. अभिनेता सलमान खान याच्या घरावर एप्रिल २०२४ मध्ये झालेल्या गोळीबार प्रकरणातलाही अनमोल बिष्णोई एक आरोपी आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं खाजगी बसच्या उघड्या डिक्कीमुळे झालेल्या अपघातात दोन महिला ठार झाल्या. पंचवटी परिसरात पहाटे तीन वाजेच्या सुमारास मध्य प्रदेशातून देवदर्शनावरुन परतलेल्या, या महिला महिला रिक्षात बसून वाळुज परिसरातल्या आपल्या घरी जात असतांना, एका खाजगी बसच्या डिक्कीच्या झाकणाला ही रिक्षा धडकली, या अपघातात रिक्षाचे छत कापलं जाऊन त्यात बसलेल्या महिलांच्या डोक्याला गंभीर इजा झाली, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचं पोलिस सूत्रांनी सांगितलं.

****

झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर इथं विश्व हिंदू परिषदेच्या वतीनं क्रांती चौकातील लक्ष्मीबाईंच्या पुतळ्याला पुष्हार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं.

माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांनाही आज त्यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र आदरांजली अर्पण करण्यात आली.

****

जालना जिल्ह्यात परतूर–मंठा परिसरातल्या वीज वितरण व्यवस्थेसाठी ३४ कोटी ४५ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी ही माहिती दिली. या माध्यमातून संपूर्ण परतूर, मंठा, जालना ग्रामीण या विभागांतर्गत

येणाऱ्या उपकेंद्रांच्या क्षमतेत लक्षणीय वाढ होऊन, ग्रामीण भागातील घरगुती ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा मिळेल, असा विश्वास लोणीकर यांनी व्यक्त केला.

****

राज्यात आज तापमान आणखी घसरल्याने थंडीचा कडाका वाढला आहे. नाशिक जिल्ह्यात निफाड इथं राज्यभरात सर्वात कमी सात अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. नाशिक इथं नऊ पूर्णांक सात अंश, तर मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर तसंच नांदेड इथं सुमारे साडे १० अंश तर परभणी इथं ११ पूर्णांक दोन अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****

जम्मू काश्मीरध्ये सुरु असलेल्या ६९ व्या शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत जळगावच्या निकीता पवार हिनं १९ वर्षाखालील गटात कांस्यपदक पटकावलं. तिने लद्दाखच्या झारा बातुल हिला पराभूत केलं.

****